१०७८९

# कहाणी

# कहाणी

# काऊची

वा म न रा व  चो र घ डे

किंमत पंचाहत्तर नवे पैसे

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible]
दा. क्र. १०७८९ नों. दि.
वि. बालवा.



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा. क्र. १०८८९



# कहाणी
# कहाणी
# काऊची



अनुक्रम ३८५८४
विभाग बालवाङ्मय
क्र. ४९२२
नों. दि.



आमची कहाणी ऐकेल कोण ?
ऐकेल कोण बरे ऐकेल कोण ?

या या मुलांनो,
या या मुलींनो,
येरे येरे आकू,
असा नको भुंकू !

येग येग गाई, कहाणी ऐकून जाई.



कहाणी कोणाची ?
कहाणी काऊची
कहाणी राणीची
कहाणी शेवईची.




एकदा
काय झाले ?

काऊने आणली आवई –
राणीने केली शेवई,
" राणी राणी, शेवई दे
माझं पोट भरू दे. "

राणी म्हणाली –
" काऊदादा ये,
शेवई घे
पण तोंड तुझे वाईट
तोंड धुवून ये. "

काऊ गेला, काऊ गेला
काऊ गेला कुठे ?
काऊ गेला नदीवर !

काऊ म्हणाला –
" नदी नदी, पाणी दे
पाणी घेईन
तोंड धुवीन
राणीघरी जाईन
मी शेवईच खाईन. "



नदी म्हणाली —
" काऊ काऊ
मजा तुमची
पाहू पाहू ?
गाडगे आण
पाणी घे. "





काऊ गेला काऊ गेला
काऊ गेला कुठे ?
काऊ गेला कुंभाराकडे

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

काऊ म्हणाला –
" कुंभारदादा कुंभारदादा,
गाडगं दे
गाडगं घेईन
नदीवर जाईन
गार गार पाण्यानं
तोंड धुवीन
राणीघरी जाईन
मी शेवईच खाईन. "



कुंभार म्हणाला –
" वारे काऊदादा,
गाडगं चोखट
मागतोस फुकट ?
माती दे मला
मग गाडगं तुला ! "

काऊ गेला काऊ गेला
काऊ गेला कुठे ?
काऊ गेला मातीकडे !



काळी माती, शेताची माती,
अक्कण माती, चिक्कण माती.

काऊ म्हणाला –
" मातीबाई मातीबाई,
माती दे मला
माती देईन
गाडगं घेईन
नदीवर जाईन
तोंड धुवीन
राणीघरी जाईन
मी शेवईच खाईन ! "



माती म्हणाली –
“ काऊदादा काऊदादा
असा रे कसा ?
हात नाही तुला
तू खणशील कसा ?
शिंगं आण
माती घे ! ”



काऊ गेला काऊ गेला
काऊ गेला कुठे ?
काऊ गेला हरिणाकडे !

हरिणदादाची ऐटदार मान
हरणाचे डोळे, किति छान छान !

काऊ म्हणाला—

" हरणदादा हरणदादा
तुझं शिंग दे
शिंग घेईन
माती खणीन
कुंभाराकडून
गाडगं घेईन
नदीवर जाईन
तोंड धुवीन
राणीघरी जाईन
मी शेवईच खाईन ! "



हरिण म्हणाले –
" वारे काऊ
तुला शिंगं देऊ ?
शेवई तुला
पण दूध तरी मला ?
मला आण दूध
तुला घे शिंग."



काऊ गेला काऊ गेला
काऊ गेला कुठे ?
काऊ गेला गाईकडे

काऊ म्हणाला –
" गाईबाई गाईबाई
मला हवं दूध !
दूध घेईन
हरिणाला देईन
शिंगं घेईन
माती खणीन
कुंभाराकडून
गाडगं घेईन
नदीवर जाईन
तोंड धुवीन
राणीघरी जाईन
मी शेवईच खाईन ! "




गाय म्हणाली –
“ काऊदादा काऊदादा
भोळा रे भोळा
दुधासाठी बघा जीव,
झाला तुझा गोळा
तुला हवं दूध
तर मला दे गवत !”



काऊ गेला काऊ गेला
काऊ गेला कुठे ?
काऊ गेला गवताकडे !

हिरवे पिवळे, गवत कोवळे !


काऊ म्हणाला—
" गवतदादा, गवतदादा
मला गवत तर दे.
गवत घेईन
गाईस देईन
गाईचं दूध
हरिणास देईन
शिंगं घेईन
माती खणीन
कुंभारवाडा जाईन
गाडगं करीन
नदीवर जाईन
तोंड धुवीन
राणीघरी जाईन
मी शेवईच खाईन ! "



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 36352
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ३१२२
नों. दि.

गवत म्हणाले –
“ वा रे काऊदादा
बराच दिसतोस
कोयता नाही
तरी गवत कापू बघतोस !
कोयता आण मोठा
मग रे कसला
गवताला तोटा ? ”

काऊ गेला काऊ गेला
काऊ गेला कुठे ?
काऊ गेला लोहाराकडे !





लोहाराची भट्टी
सणसण !
घण मारतो
घणघण !

काऊ म्हणाला –
" लोहारदादा लोहारदादा
जरा कोयता तर दे
कोयत्याने सप सप
गवत कापू दे
गाईबाई कोवळे
गवत खाईल
मग मला भरभर
दूध येईल
दूध पिऊन हरणदादा
शिंगं देईल,
शिंगं घेईन
माती खणीन
कुंभारवाडा जाईन
गाडगं करीन
नदीवर जाईन
तोंड धुवीन
राणीघरी जाईन
मी शेवईच खाईन ! "




मग काय झाले बरे
मग काय झाले ?
लोहाराने काऊला
कबूल केले !






लोहाराने दिला कोयता
कोयत्याने कापले गवत
गवत खाल्ले गाईने
गाईने दिले दूध
हरीण दूध प्याला
शिंगं दिले काऊला
शिंगाने खणली माती
कुंभारदादासाठी
गाडगे घेतले काऊने
पाणी दिले नदीने



मग काय झाले बरे
मग काय झाले ?
राणीने काऊला
विचारिले !

राणी म्हणाली –
" काऊदादा काऊदादा
आला तोंड धुवून ? "



काऊ म्हणाला –
" राणीबाई राणीबाई
घ्या बरं पाहून ! "

राणी म्हणाली –
" छान छान काऊदादा
चांगलं केलंस "

काऊ म्हणाला –
" पण उडून उडून आमचे
पंख दुखले ! "

" घ्या घ्या काऊदादा
खिरीची वाटी ! "



" द्या द्या राणीबाई
भूक लागली मोठी ! "



काऊ खातो शेवई
आम्ही खातो खाऊ
कहाणी आमची संपली
चला घरी जाऊ !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम
विभाग बालवाङ्मय
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ........ नों. दि ........
वि. ........ क्र. ........

लेखक :
**वामन के. चोरघडे**

प्रकाशक :
**गो. य. राणे**
टिळक रोड, पुणे २

मुद्रक :
**वि. ग. माटे**
विश्वकर्मा मुद्रणालय
४०५ नारायण, पुणे २

चित्रकार
**अनंत सालकर**
६५ शनवार, पुणे २

मूल्य :
**पंचाहत्तर नवे पैसे**

१५ ऑगस्ट १९६३